न्यायाधीश, सहकार न्यायालय, नाशिक या नावाने नवीन PLA खाते उघडण्याकरीता परवानगी देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सहकार विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -०१२६/प्र.क्र.०९/५स
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : - १५ जुलै, २०२६

संदर्भ:- अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, म.रा., पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.७-सआ/लेखा/स्वीय प्रपंची/नाशिक न्यायालय/२०२५/८८३, दि.२४/१०/२०२५ रोजीचे पत्र

प्रस्तावना:-

अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, म.रा., पुणे यांनी संदर्भाधीन पत्रान्वये सादर केलेला न्यायाधीश, सहकार न्यायालय, नाशिक या नावाने नवीन PLA खाते उघडण्याकरीता परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, म.रा., पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने न्यायाधीश, सहकार न्यायालय, नाशिक या नावाने नवीन PLA खाते उघडण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१) न्यायाधीश, सहकार न्यायालय, नाशिक यांच्या नावे उघडण्यात येणाऱ्या स्वीय प्रपंजी लेखा खात्याचा वापर अशीलांनी भरणा केलेल्या ठेवी, दाव्यातील दंडाच्या रकमा जमा करण्यात याव्यात. तसेच दाव्यातील डिपॉझीट केलेल्या रकमांचा परतावा करण्यात यावा.

२) वित्त विभाग, शासन निर्णय दि. २४ जानेवारी, २०१४ मधील सूचनांनुसार स्वीय प्रपंजी लेखा खाते एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपर्यंत निष्क्रिय असल्याने बंद करण्यात आल्यास सदर खात्यातील जमा रक्कम लेखाशिर्ष ००७५ मध्ये शासन खाती जमा करण्यात याव्यात.

३) सदर स्वीय प्रपंजी लेखा खात्यामध्ये वेळोवेळी आर्थिक व्यवहार करणे व सदर लेखा खाते बंद पडणार नाही, याची दक्षता संबंधीत कार्यालयांनी घ्यावी.

४) सदर लेखा खात्याच्या व्यवहारांचे ताळमेळ (reconciliation) व परिक्षण याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालयांची राहील.

५) वित्त विभाग, दि.०५ सप्टेंबर, २०२३ च्या शासन निर्णयातील सूचनांचे काटेकोर अनुपालन करावे.

२.	वरील अटी शर्तींबरोबरच मा. महालेखापालांच्या खालील सूचनांचेही पालन करावे:-

२.१	The said Personal Ledger Account shall be subject to Audit.

२.२	The Administrator should ensure proper maintenance of Account.

२.३	Receipt into the PD account will be the clients Deposit Amount and fine amount in respect of cases. Expenditure out of the Personal Deposit Account will be as per order of the court.

२.४	No Revenue receipt/Revenue expenditure transactions shall be booked in this PD.

२.५	As per GR of Finance Department dated 24.01.2014, if the PD Account is closed owing to no transactions for a period of more than a year, the unspent balance should be credited to Major Head "0075 - Miscellaneous Receipts"

२.६	On a Monthly basis, the balances in this Personal Deposit Account shall be reconciled with the Treasury Office and yearly reconciliation with A G office for all types of Personal Deposits.

२.७	At the end of each Financial Year, the balance in the PD may be forwarded by the Treasury office to PAO Mumbai for confirmation.

२.८	The Finance Department GR dated 5.09.2023 regarding operation of the PD/PLA should be followed.

२.९	All Rules in Maharashtra Treasury Rules will be applicable to this Personal Deposit Account.

३.	सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४५/२०२६ को.प्र.-५, दि.२९/०४/२०२६ व मा. महालेखापाल कार्यालयाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.TM/Ch.२/UOR/सहकार विभाग/UOR no.६३/२०२६-२७/४८६, दि.२३/०६/२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०७१५१६५०२००१४७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरी ने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

SUNIL DEORAM AGARKAR

Digitally signed by SUNIL DEORAM AGARKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=BD05F4FDBBB9ED343F1BE2CAF44A80E981A9AAAA980ED10ED0E2772DFCCA67CC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=01A0A8594022E4572C9EE1F979883E0867C70D25B214D7205F60D0D0F23484C9, cn=SUNIL DEORAM AGARKAR
Date: 2026.07.15 16:50:59 +05'30'

(सुनिल आगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.	सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२.	मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, नाशिक

३.	अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४.	उपसचिव, वित्त विभाग (कोषा प्रशा ५), मंत्रालय, मुंबई.

५.	वरिष्ठ लेखाधिकारी, महालेखाकार कार्यालय (लेखा व हकदारी), मुंबई/नागपूर.

६.	निवड नस्ती ५-स.